भारतीय लोककलेचा तेजस्वी अध्याय संपला; पद्मविभूषण डॉ. तीजन बाई काळाच्या पडद्याआड >> पान 2

आषाढी वारीत प्रथमच एअर ॲम्बुलन्स : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर >> पान 3

डोणगाव ग्रामपंचायतीचा ढिसाळ कारभार? >> पान 4

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 05 ■ अंक 03 ■ सोमवार, दि. 06 जुलै 2026 ■ पाने 4 ■ किंमत रु. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

### सुविचार

आपले विचार वाळूत लिहा, क्षमेचे वारे त्यांना उडवून लावेल. आपले सुख दगडात कोरा, ते कोणीही खोडू शकणार नाही.



**१५ वर्षांनंतर सेलिना मोठ्या पडद्यावर परतणार, 'सिस्टर निवेदिता'ची भूमिका साकारणार**

आतील पान

# पावसानं उडवली दाणादाण

## मुसळधार पावसामुळे मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरीतील शाळा, महाविद्यालयांना आज सुट्टी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी : रत्नागिरी, ठाणे आणि मुंबईतील सर्व शासकीय खासगी, महानगरपालिका शाळा व महाविद्यालयांना सोमवारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. भारतीय हवामान विभागानं मुंबई महानगराला सोमवारी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट तसेच सोसाट्याचे वारे वाहतील असा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता मुंबईतील सर्व शासकीय, खासगी शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे, अशी माहिती महानगरपालिका प्रशासनानं दिली आहे. दुसरीकडं शासकीय व खासगी कार्यालय नियमितपणे सुरूच राहतील. आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडावं, असं आवाहन देखील मुंबई महानगरपालिकेनं केलं आहे.**





१४२ झाडे, फांद्या पडण्याच्या घटनांच्या नोंदी : बृहन्मुंबई क्षेत्रात म्हणजेच मुंबई शहर व उपनगरामध्ये विविध भागांमध्ये गेल्या २४ तासांमध्ये सुमारे १५०–१७० मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. ताशी ७२ ते ७५ किलोमीटर वेगानं वाहणाऱ्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे बृहन्मुंबई क्षेत्रामध्ये झाडं किंवा फांद्या पडण्याच्या एकूण १४२ घटनांची नोंद करण्यात आली आहे. या संपूर्ण परिस्थितीमध्ये मुंबई महानगरपालिकेसह विविध यंत्रणांचे सुमारे दहा हजार अधिकारी, कर्मचारी शनिवार व रविवार या सुट्टीच्या दिवशीही आपल्या कार्यक्षेत्रात काम करत असल्याची माहिती मुंबई महानगरपालिकेनं दिली आहे. याचबरोबर वरिष्ठ अधिकारी देखील प्रत्येक घडामोडीवर सातत्यानं बारकाईनं लक्ष ठेवून असल्याचंही यावेळी सांगण्यात आलं.

कुर्ला कमानी इथं गोम्स टाऊन इमारती जवळील दुकानावर झाडांची फांदी तुटून युनूस कुंदावाला वय ६३ या व्यक्तीचा दुर्दैवी मृत्यू झाला. दुसरीकडं आरे कॉलनीमध्ये युनिट १६ हद्दीत झाड कोसळून कुमार हसन रजा जहांगीर आलम सईद या १८ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला. तर आरे डेअरी जवळ खान अब्दुल गफारखान मार्गावर तीन मजली रिकामं असलेलं बांधकाम पडल्याची देखील नोंद झाली. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

मुंबई प्रमाणंच ठाणे जिल्ह्यासाठी भारतीय हवामान विभागानं उद्या ऑरेंज अलर्ट दिला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्या तसेच प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना उद्या सोमवारी सुट्टी जाहीर केली आहे. जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी रात्री उशिरा परिपत्रक प्रसिद्ध केलं. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना प्रशासनानं दिल्या आहेत. तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्ष, अग्निशमन विभाग तसेच संबंधित विभागांना सतर्क राहण्यास सांगितलं असून नागरिकांनी गरज नसल्यास घराबाहेर पडू नये असं, आवाहन ठाणे महापालिका प्रशासनानं केलं आहे.

रत्नागिरीमध्ये नद्यांनी ओलांडली इशारा पातळी : रत्नागिरी जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झालं आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाधिकाऱ्यांनी उद्या सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली आहे. सततच्या पावसामुळे जगबुडी नदीनं धोक्याची पातळी ओलांडल्यानं शहराला पुराचा धोका निर्माण झाला. तर वाशिष्ठी नदीनंही इशारा पातळी ओलांडली आहे. जिल्ह्यातील बिघडलेली पूरस्थिती लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनानं खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेतला असून नागरिकांना सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे.

### शववाहिका न आल्यानं पतीनं पत्नीचा मृतदेह नेला दुचाकीवरुन : झारसुगुडामधील धक्कादायक प्रकार

भुवनेश्वर : शववाहिका न मिळाल्यानं हतबल पतीनं पत्नीचा मृतदेह दुचाकीवरुन नेल्यानं मोठी खळबळ उडाली. ही घटना ओडिशामधील जारसुगुडा इथं घडली आहे. नरेश छत्रीया असं पत्नीचा मृतदेह दुचाकीवरुन नेणाऱ्या पतीचं नाव आहे. यमुना छत्रीया असं त्यांच्या मृत पत्नीचं नाव आहे. पती पत्नीचा मृतदेह दुचाकीवरुन नेत असल्याचा व्हिडिओ सोशल माध्यमात मोठ्या प्रमाणात व्हायरल झाल्यानं प्रशासनाची झोप उडाली.

झारसुगुडा येथील लायसेरामधील भाटलाईडा पंचायती समितीअंतर्गत येणाऱ्या ओडियापाली गावात ही घटना घडली. ओडियापाली गावातील नरेश छत्रीया यांची पत्नी, यमुना छत्रीया आजारी पडल्यानं त्यांना शनिवारी सकाळी मुद्रजोर इथल्या प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आलं. तिथं डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं.

## शेतकरी कर्जमाफीचा मार्ग मोकळा! 'अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजने'ची नियमावली जाहीर; यादीतून कुणाची नावे वगळणार?

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर । प्रतिनिधी :** सरकारने अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली आहे. दोन लाखांपर्यंत शेतकऱ्यांचे पीक कर्ज माफ करण्यात येणार आहे. या योजनेंतर्गत ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची कर्जमाफी देण्यात येणार आहे. १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२६ अखेर उचल केलेल्या अल्पमुदत पीक कर्जखात्यांची एक किंवा अनेक बँकांकडील सर्व कर्ज खात्यांची मुद्दल व व्याजासह ३० सप्टेंबर २०२५ अखेर थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली एकत्रित थकबाकीची रक्कम दोन लाखांपेक्षा जास्त असेल तर अशा शेतकऱ्यांनी दोन लाखांवरील रक्कम भरल्यानंतर त्यांना लाभ मिळणार आहे. त्याच प्रमाणे नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांनाही ५० हजार रुपये प्रोत्साहन पर देण्यात येणार आहे.



### लाभार्थी यादीतून यांची नावे होणार कमी

दोन लाख रुपये पर्यंतची थकीत रक्कम माफ होणार आहे. यासाठी प्रशासनाकडून थकबाकीदार शेतकऱ्यांची माहिती शासनाने घेतली. प्रशासनाकडून सरसकट सर्वच शेतकऱ्यांची माहिती पाठवण्यात आली. परंतु आता शासनाने कर्जमाफी देण्यासाठी काही अटी घातल्या आहेत. केंद्र सरकारची शेतकरी सन्मान योजना आणि राज्य शासनाकडून यापूर्वी देण्यात आलेल्या कर्जमाफीनुसार या अटींचा समावेश असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे लोकप्रतिनिधी, करदाते, शासकीय महामंडळावरील पदाधिकारी यांना याचा लाभ मिळणार नसल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे यांची नावे यादीतून नावे कमी करण्यात येणार असल्याचे बोलल्या जात आहे.

सरकारने पावसाळी अधिवेशनात यासाठी २० हजार कोटी रुपयांची तरतूदही केली आहे.

**शासनाने मागवली माहिती**

सरकारकडून या महिन्यात कर्जमाफीचा प्रत्यक्ष लाभ मिळणार असल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांकडून व्याजाची आकारणी न करता कर्जपुरवठा करण्याच्या सूचना सरकारने सर्व बँकांना दिल्यात. कर्जमाफीचा लाभ देण्यासाठी शासनाने तयारी सुरू केली असून लोकप्रतिनिधी, करदात्यांसोबत विविध महामंडळ व कृषी उत्पन्न बाजार समिती आणि सहकार संस्थांवरील पदाधिकाऱ्यांची माहिती शासनाने मागवली आहे. विविध विभागाकडून संबंधित माहितीही पाठवण्यात येत असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

**लाभार्थी शेतकऱ्यांची यादी जाहीर होणार**

सरकारकडे शेतकऱ्यांची यादी आहे. जे पात्र ठरणार नाहीत, त्यांची नावे यादीतून वगळण्यात येतील. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार पात्र शेतकऱ्यांची यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. ही यादी सहकार विभागासहसह बँकाकडेही देण्यात येणार असल्याचे सांगण्यात येते.

### नवी मुंबईतील पांडवकडा धबधब्यावर नो एन्ट्री, पोलिसांकडून नाकाबंदी, २ तरुण गेले वाहून

**पनवेल । प्रतिनिधी :** नवी मुंबईतील खारघर परिसरातील प्रसिद्ध पांडवकडा धबधब्यावर विकेंडचा आनंद घेण्यासाठी पर्यटकांनी प्रचंड गर्दी केली आहे. विशेष म्हणजे, याच धबधब्यावरून शनिवारी दोन तरुण वाहून गेल्याची धक्कादायक घटना घडली होती. या दोघांचा अजूनही शोध लागलेला नाही. असं असतानाही पर्यटकांनी पांडवकडा धबधब्यावर गर्दी केल्याचं पाहायला मिळत आहे. मात्र, संभाव्य धोका ओळखून नवी मुंबई पोलिसांनी पर्यटकांना धबधब्यापर्यंत जाण्यास पूर्णपणे मज्जाव केला आहे.

खारघरमधील पांडवकडा धबधबा हा पर्यटकांचे मोठं आकर्षण केंद्र आहे. पावसाळा सुरू होताच या ठिकाणी निसर्गाचा आनंद घेण्यासाठी हजारो पर्यटक येत असतात. मात्र, या धबधब्याचा वेग आणि खोली अत्यंत धोकादायक आहे. दोन तरुण या धबधब्यातून वाहून गेल्याची घटना ताजी असताना आणि त्यांचा शोध अद्याप लागला नसतानाही, आज पर्यटकांनी या ठिकाणी पुन्हा गर्दी केली.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन नवी मुंबई पोलिसांनी पांडवकडा परिसरात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे. मुख्य प्रवेशद्वारावरून कोणत्याही पर्यटकाला पुढे सोडलं जात नाहीये.

अनेकदा पर्यटक मुख्य रस्ता सोडून डोंगराच्या किंवा जंगलाच्या इतर चोरट्या मार्गाने धबधब्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करतात. हे लक्षात घेऊन पोलिसांनी इतर छुप्या मार्गांवरही आपले जवान तैनात केले आहेत. पोलिसांकडून पर्यटकांना समजावून सांगून माघारी पाठवलं जात आहे.

# महाराष्ट्रात पुन्हा राजकीय भूकंप?

## २० कोटींच्या ऑफरचा दावा; धीरज लिंगाडेंकडून स्पष्ट फेटाळणी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई । प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणात पुन्हा एकदा राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता व्यक्त केली जात असतानाच, खासदार संजय राऊत यांनी केलेल्या एका दाव्यामुळे नवा वाद निर्माण झाला आहे. एका आमदाराला सत्ताधारी गटाकडून २० कोटी रुपयांची ऑफर देण्यात आल्याचा गंभीर आरोप राऊत यांनी केला. मात्र, संबंधित आमदार धीरज लिंगाडे यांनी हा दावा स्पष्ट शब्दांत फेटाळून लावला आहे.

संजय राऊत यांनी प्रसारमाध्यमांशी



बोलताना, ''आमदार-खासदार आणि कार्यकर्त्यांना फोडण्यासाठी पैशांचा वापर केला जात आहे. धीरज लिंगाडे यांना २० कोटी रुपयांची ऑफर देण्यात आली,'' असा आरोप केला. त्यांनी यावेळी राज्यातील सुरू असलेल्या राजकीय घडामोडींवरही टीका केली.

दरम्यान, आमदार धीरज लिंगाडे यांनी राऊत यांचा आरोप निराधार असल्याचे सांगितले. ''मला कोणत्याही प्रकारची ऑफर आलेली नाही. २० कोटी रुपयांची ऑफर दिल्याचा प्रश्नच उद्भवत नाही,'' असे त्यांनी स्पष्ट केले.

**धीरज लिंगाडे कोण?**

धीरज लिंगाडे हे अमरावती पदवीधर मतदारसंघाचे विधान परिषद सदस्य असून ते काँग्रेसचे आमदार आहेत. २०२३ मधील विधान परिषद निवडणुकीत त्यांनी भाजपचे उमेदवार आणि माजी गृहराज्यमंत्री रणजित पाटील यांचा पराभव केला होता.

राजकीय प्रवासात त्यांनी सुरुवातीला



शिवसेनेतून नगरसेवक म्हणून काम केले. २०१० मध्ये बुलढाणा जिल्हाप्रमुख म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. त्यानंतर २०२३ च्या विधान परिषद निवडणुकीपूर्वी त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि काँग्रेसच्या तिकिटावर विजय मिळवला.

सध्या संजय राऊत यांच्या आरोपांनंतर आणि धीरज लिंगाडे यांच्या फेटाळणीनंतर या प्रकरणाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू असून, आरोपांबाबत कोणतेही स्वतंत्र पुरावे अद्याप सार्वजनिक झालेले नाहीत.

### भ्रष्टाचार विरोधी मोहीम सुरुच राहील



## आंदोलनाचे नेमके फलीत काय मिळणार ?

राम मंदिराच्या दानपेटीतील निधीच्या अपहारप्रकरणी आंदोलन करण्याचा उद्धव ठाकरेंचा निर्णय बुचकळ्यात टाकणाराच म्हणावा लागेल. ते नेमके कोणाविरोधात आंदोलन करणार आहेत आणि त्याचा उद्देश काय? कारण, या प्रकरणाचा तपास झपाट्याने होत असून, आतापर्यंत आठ आरोपींना अटकही करण्यात आली आहे. त्यांच्याकडून लाखो रुपयांची रोकडही जप्त करण्यात आली. मग उद्धव ठाकरेंचे आंदोलन कोणाविरोधात आहे? आणि कशासाठी? अयोध्यातील राम मंदिराच्या दानपेटीतील अपहाराविरोधात आंदोलन करण्याचा निर्णय उद्धव ठाकरे यांनी काल जाहीर केला. पण, ते कोणाविरोधात आणि कशासाठी आंदोलन करणार आहेत, हे एक कोडेच! याचे कारण, या प्रकरणाचा तपास अतिशय वेगाने सुरू असून, आतापर्यंत आठ आरोपींना अटकही करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याच आदेशावरून या अपहार प्रकरणाचा तपास करण्यासाठी विशेष तपास पथकाची स्थापना झाली असून, पोलिसांनी याप्रकरणी आठ आरोपींना अटकही केली. त्यांच्याकडून काही लाख रुपयांची रोकडही जप्त करण्यात आली. योगी सरकारचे बुलडोझर या आरोपींच्या घरांबाहेर हुकुमाची वाट पाहात उभे आहेत. खरेतर इतक्या तडकाफडकी कोणत्याही आर्थिक घपल्याचा तपास आजवर झालेला नाही. त्यामुळे विरोधकांची मोठी कुचंबणा झालेली दिसते. या अपहाराचा संबंध योगी आदित्यनाथ किंवा उत्तर प्रदेश राज्य सरकारशी जोडताच येत नाही. कारण, राम मंदिराचा ट्रस्ट हा पूर्णपणे खासगी आहे. तो राज्य किंवा केंद्र सरकारशी जोडलेला नाही किंवा त्याच्या विश्वस्त मंडळात सरकारचा प्रतिनिधीही नाही. त्यामुळे योगी यांच्यावर टीका करताच येत नाही. शिवाय, योगींच्या कार्यशैलीमुळे त्यांच्याविरोधात टीकेचा उच्चारही करण्याची एकाही विरोधी नेत्याची छाती झालेली नाही. म्हणूनच, उद्धव ठाकरे यांचा याप्रकरणी आंदोलन करण्याचा निर्णय गोंधळात टाकणारा आहे. ते नेमके कशासाठी आणि कोणाविरोधात आंदोलन करणार आहेत? खरी गोष्ट अशी की, पुढील वर्षी होणाऱ्या उत्तर प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीत या प्रकरणाचा वापर करून भाजपविरोधात वातावरण तापवण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे. पण, वरील कारणांमुळे त्याची हवाच निघून गेली. उत्तर प्रदेशातील प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या समाजवादी पक्षानेही याप्रकरणी आंदोलन सुरू केलेले नसताना, महाराष्ट्रातील उद्धव ठाकरे हे कशासाठी आंदोलन करीत आहेत, हा प्रश्नच आहे. सर्व बाजूंनी कोंडी झाल्यामुळे उद्धव ठाकरेंना आता पुन्हा एकदा हिंदुत्वाची आठवण झाली. प. बंगालमधील विधानसभा निवडणुकीतील भाजपच्या प्रचंड विजयाने सर्व कथित सेक्युलर पक्षांचे धाबे दणाणले आहेत. कारण, ज्या मुस्लीम मतपेढीच्या जोरावर सत्तेवर येण्याची स्वप्ने हे पक्ष बघत होते, ते स्वप्नच उद्‌ध्वस्त झाले आहे. परिणामी, आता हिंदूंच्या मतांशिवाय सत्ता मिळविता येणार नाही, याची जाणीव झाल्यामुळे आजवर राम मंदिराला प्रत्यक्षा-प्रत्यक्षपणे विरोध करणाऱ्या सर्व विरोधी नेत्यांना आज प्रभू रामांचा पुळका आला आहे. उद्धव ठाकरे यांनाही या बदललेल्या परिस्थितीची जाणीव झाली असावी. राज्यात तर पक्ष आणि निवडणूक चिन्ह हातून गेलेच होते. आता लोकसभेतील जेमतेम नऊपैकी सहा खासदारही त्यांना सोडून गेले आहेत. विधान परिषदेतील तीनापैकी एक आमदारही गेला आहे. आता विधान परिषद आणि राज्यसभेत त्यांच्या गटाच्या एकाही नेत्याला पाठविणे त्यांना शक्य नाही. शिवाय, ज्या मुस्लिमांच्या मतपेढीवर ते उड्या मारीत होते, त्यांचा काही उपयोग होणार नाही, हेही त्यांच्या लक्षात आले असेल. परिणामी, ज्या हिंदुत्वाला लाखोली वाहून त्यांनी राजकीय हाराकिरी केली, त्या हिंदुत्वालाच पुन्हा शरण जाण्याशिवाय पर्याय नाही, हेही त्यांच्या लक्षात आले असावे. म्हणूनच, महाराष्ट्रात राम मंदिरातील अपहाराविरोधात आंदोलन करण्याचा निर्णय जाहीर करून आपण आजही हिंदुत्ववादी आहोत, हे दाखविण्याची त्यांची केविलवाणी धडपड सुरू आहे. पण, मतदाराने उबाठांचे हिंदुत्व काय प्रकारचे आहे, त्याचा चांगलाच अनुभव घेतल्याने अशी १०० आंदोलने करूनही त्याचे परिमार्जन होणार नाही. सेक्युलर धर्माने बाटलेल्या उबाठांनी सत्तेत असताना आपल्या 'मातोश्री' बंगल्याबाहेर 'हनुमान चालीसा' म्हणण्यावर बंदी घातली होती आणि तसे करणाऱ्या राणा दाम्पत्याला तुरुंगात टाकले होते. आज त्यांना दादरच्या हनुमान मंदिराबाहेरच आंदोलन करण्याची वेळ आली आहे, हा काव्यगत न्यायच म्हणायला हवा. मुख्यमंत्री असताना उबाठांच्या सरकारने हिंदुत्व खुंटीला टांगले होते. त्यांचे सरकार 'अझान' स्पर्धा घेण्यात आणि मैदानाला 'टिपू सुलताना'चे नावे देण्यात मग्न होते. 'जनाब' बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने उर्दू दिनदर्शिका छापणे, मुंबईतील साखळी बॉम्बस्फोटांचा गुन्हेगार याकूब मेमन याच्या कबरीचे सुशोभीकरण करणे, उर्दू भवनाच्या निर्मितीसाठी निधी देणे यांसारखे उदात्त कार्यक्रम त्यांचे सरकार आखत होते. इतकेच नव्हे, तर भगव्या ध्वजाला 'फडके' म्हणण्यापर्यंत उबाठांची मजल गेली होती. 'ईशनिंदा' कायदा करण्याचे आश्वासन त्यांनी मौलवींच्या शिष्टमंडळाला दिले होते. तसेच संसदेत त्यांच्या गटाने 'वफ' कायद्यातील सुधारणांविरोधात मतदान केले होते. 'कोविड'च्या काळात मंदिरे बंद ठेवली होती. पण, मद्यविक्रीची दुकाने सुरू ठेवली होती. मंदिरांवर अवलंबून असलेल्या मराठी व हिंदू व्यावसायिकांचा विचार त्यांच्या मनाला तेव्हा यत्किंचितही शिवला नव्हता. 'हिंदू' शब्दही त्यांनी तोंडातून काढणे थांबविले होते. इतकेच नव्हे, तर २०२४च्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात चेंबूरमध्ये चित्ता कॅम्प येथे सभेत मुस्लीम जमाव पाहून त्यांनी चक्क हिंदीत भाषण केले. तेव्हा त्यांचे मराठीप्रेम कुठे गेले? म्हणजे ना मराठीवर प्रेम, ना हिंदुत्वाबद्दल आस्था! या गोष्टी त्यांच्या दृष्टीने केवळ मते मिळविण्याचे सोयीस्कर साधन आहे. पालघरमध्ये साधूंच्या हत्याकांडाने त्यांचे हिंदुत्व किती बेगडी आणि बनावट आहे, ते स्पष्ट झालेच. काही प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पडून, फुटीरांनी भाजपला पाठिंबा दिला. पण, महाराष्ट्रात उबाठांनी अनेकदा सूचक संदेश देऊनही भाजप त्यांना पुन्हा 'रालोआ'मध्ये घेण्यास अनुत्सुकच. परिणामी, त्यांची स्थिती अधांतरी झाली आहे. या अधांतरी अवस्थेमुळे उबाठांची पूर्ण कुचंबणा होत आहे. त्याचा राग आल्यामुळेच भाजपविरोधात त्यांनी या आंदोलनाचा निर्णय घेतला असावा. उबाठांचे हे कथित आंदोलन त्यांची गोंधळलेली मन:स्थिती दर्शविते. भाजपने त्यांची चारी बाजूंनी कोंडी केल्यामुळे भाजपवरील राग काढण्याचा एक मार्ग म्हणून त्यांनी या बेगडी आंदोलनाची घोषणा केली आहे, ज्याचे फलित शून्यच!

# भारतीय लोककलेचा तेजस्वी अध्याय संपला; पद्मविभूषण डॉ. तीजन बाई काळाच्या पडद्याआड

**दैनिक आपला विदर्भ**

**दुर्ग । वृत्तसंस्था** : छत्तीसगडच्या लोकसंस्कृतीला जागतिक स्तरावर ओळख मिळवून देणाऱ्या, प्रसिद्ध पंडवानी गायिका आणि पद्मविभूषण पुरस्कार विजेत्या तीजन बाई यांचे आज रविवारी (५ जुलै) पहाटे ३:१५ वाजेच्या सुमारास एम्स (अघ्घ्श्ए) रायपूर इथं निधन झालं. मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी काल शनिवारी रात्री उशिरा त्यांच्या कुटुंबीयांशी दूरध्वनीवरून संवाद साधून त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली होती.

पद्मविभूषण तीजन बाई यांचे निधन : पद्मविभूषण पुरस्कार विजेत्या तीजनबाई बऱ्याच काळापासून आजारी होत्या आणि रायपूर येथील एम्स रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. त्यांच्या निधनाच्या बातमीमुळे केवळ राज्यातच नव्हे, तर संपूर्ण देशभरातील कला आणि सांस्कृतिक क्षेत्रात शोककळा पसरली आहे.

तीजन बाईनी आपल्या अद्वितीय गायनशैली आणि प्रभावी सादरीकरणाच्या माध्यमातून 'पांडवानी' या लोकगाथा परंपरेला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर नेऊन ठेवलं. आपला दमदार आवाज, अभिनय आणि भावपूर्ण सादरीकरणाद्वारे महाभारतातील कथा जिवंत करत, त्यांनी भारत आणि परदेशात हजारो वेळा सादरीकरण करून छत्तीसगडच्या समृद्ध लोकसंस्कृतीची प्रतिष्ठा उंचावली आहे.

**'पांडवानी' या लोक-महाकाव्याला आंतरराष्ट्रीय मंचावर पोहोचवलं :** तीजनबाईनी 'पांडवानी' या लोकगाथा गायन परंपरेला आंतरराष्ट्रीय मंचावर पोहोचवलं. लोककला आणि संस्कृतीच्या क्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाची दखल घेत, भारत सरकारनं त्यांना 'पद्मश्री', 'पद्मभूषण' आणि त्यानंतर देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेल्या 'पद्मविभूषण' पुरस्कारानं सन्मानित केलं. याव्यतिरिक्त, त्यांना 'संगीत नाटक अकादमी पुरस्कारा'सह अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय सन्मानही प्राप्त झाले.

**'पांडवानी'नं परदेशात आपली छाप पाडली :** तीजन बाई यांनी सादर केलेल्या



पांडवानीतील 'दुशासन वध' या प्रसंगाला जगभरात लोकप्रियता मिळाली. १९८० मध्ये सांस्कृतिक दूत म्हणून त्यांनी इंग्लंड, फ्रान्स, स्वित्झर्लंड, जर्मनी, तुर्की, माल्टा, सायप्रस, रोमानिया आणि मॉरिशस या देशांचा दौराही केला.

**तीजन बाई यांना अनेक पुरस्कार मिळाले :** त्यांना १९८८ मध्ये 'पद्मश्री' आणि १९९५ मध्ये 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार' प्रदान करण्यात आला. कला क्षेत्रातील योगदानाबद्दल २००३ मध्ये त्यांना 'पद्मभूषण' देऊन सन्मानित करण्यात आलं आणि २००७ मध्ये त्यांना 'नृत्य शिरोमणी' ही पदवी मिळाली. २०१७ मध्ये खैरागढ संगीत विद्यापीठानं त्यांना मानद 'डी.लिट.' (ऊथ्रू.) पदवी प्रदान केली आणि २०१९ मध्ये त्यांना 'पद्मविभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं. चार मानद 'डी.लिट.' पदव्यांव्यतिरिक्त, त्यांना जपानमधील 'फुकुओका पुरस्कारा'नेही सन्मानित करण्यात आलं.

**तीजनबाई यांच्याबाबत महत्त्वाची माहिती :** ८ ऑगस्ट १९५६ ला तीजनबाईचा जन्म : तीजन बाई यांचा जन्म ८ ऑगस्ट १९५६ रोजी दुर्ग जिल्ह्यातील पाटन ब्लॉकमधील 'अटारी' गावात झाला. 'तीज' या लोकसणाच्या दिवशी जन्म झाल्यामुळे त्यांच्या पालकांनी त्यांचे नाव 'तीजन' असं ठेवलं. त्यांच्या आईचं नाव सुखवती देवी आणि वडिलांचे नाव हुनुकलाल पारधी होते. त्या त्यांच्या कुटुंबातील पहिलं अपत्य होत्या. तीजन बाईचं बालपण अत्यंत गरिबीत आणि अभावग्रस्त परिस्थितीत



गेलं. पशू-पक्ष्यांचे आवाज, आईची लोकगीते आणि वडिलांचे बासरीवादन यांमुळे त्यांच्या मनात संगीताविषयीची तीव्र आवड निर्माण झाली.

**कुटुंब अनब समाजाकडून विरोधाचा सामना :** एके दिवशी, आपल्या आजोबांना 'पांडवानी' गाताना ऐकून त्यांनी ही लोककला आत्मसात करण्याचा निश्चय केला. अवघ्या ९ वर्षांच्या वयात त्यांनी आजोबा ब्रिजलाल पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्या काळात, पारधी समाजातील एखाद्या मुलीनं सार्वजनिकरीत्या 'पांडवानी' गाणं हे सामाजिक मान्यतांच्या विरोधात म ानलं जात असे. परिणामी, कुटुंब आणि समाज अशा दोघांकडूनही विरोधाचा सामना करावा लागला, इतकंच नव्हे तर त्यांना घराबाहेरही काढण्यात आलं. 'पांडवानी' गायनाच्या या ध्यासाचा त्यांच्या पहिल्या आणि दुसऱ्या विवाहांवरही परिणाम झाला, तरीही त्यांनी कधीच हार मानली नाही.

**वयाच्या १३ व्या वर्षी पहिला सार्वजनिक कार्यक्रम :** वयाच्या १३ व्या वर्षी त्यांनी चांदखुरी गावातील सतीचौरा चौकात आपला पहिला सार्वजनिक कार्यक्रम सादर केला. त्यानंतर त्यांची ख्याती केवळ शेजारच्या गावांपुरती मर्यादित न राहता भिलाई, दुर्ग, रायपूर आणि भोपाळपर्यंत पसरली. भोपाळमधील 'भारत भवन' इथं झालेल्या एका सादरीकरणादरम्यान, त्यांच्या प्रतिभेनं प्रभावित होऊन तेथील नामवंत नाट्य-कलाकारांनी त्यांना तत्कालीन पंतप्रधानांकडे सादरीकरण करण्याची संधी मिळवून दिली.

त्यांची प्रतिभा ओळखून एका नामांकित चित्रपट दिग्दर्शकानं त्यांना आपल्या दूरचित्रवाणी मालिकेत काम करण्याचं निमंत्रण दिलं. यानंतर त्यांना १९८६ मध्ये नोकरीची संधी मिळाली. तीजन बाई यांनी साक्षरता, महिलांचे हक्क आणि लोककलेचं जतन या क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य केलं आहे. आपल्या संघर्षातून, निष्ठेतून आणि असाधारण प्रतिभेच्या जोरावर त्यांनी 'पांडवानी' या कलाप्रकाराला जागतिक व्यासपीठावर नेलं आणि त्याद्वारे छत्तीसगडची सांस्कृतिक ओळख एका नव्या उंचीवर नेऊन ठेवली.

**मुख्यमंत्री साय यांची एम्स रायपूरला भेट :** तीजन बाई यांच्या निधनाचं वृत्त समजताच मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी एम्स रायपूरला भेट दिली. आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणाले, ''छत्तीसगडच्या लोकसंस्कृतीच्या दिग्गज कथाकार, पद्मविभूषण पुरस्कार विजेत्या आणि जगप्रसिद्ध पंडवानी कलाकार डॉ. तीजन बाई यांच्या निधनाची बातमी अत्यंत दु:खद आहे. त्यांचे जाणे ही केवळ लोककलेच्या क्षेत्रासाठीच नव्हे, तर छत्तीसगडच्या सांस्कृतिक वारशासाठी आणि संपूर्ण देशासाठी कधीही भरून न येणारी हानी आहे. आपल्या अद्वितीय गायनशैली, असाधारण प्रतिभा आणि लोकपरंपरा जतन करण्याप्रती असलेल्या निष्ठेच्या जोरावर त्यांनी जागतिक स्तरावर छत्तीसगडची सांस्कृतिक ओळख निर्माण केली. त्यांचे अतुलनीय योगदान सदैव स्मरणात राहील. दिवंगत आत्म्यास प्रभू श्रीरामांच्या चरणी स्थान मिळावं आणि त्यांच्या शोकाकुल परिवाराला, असंख्य चाहत्यांना व संपूर्ण लोककला क्षेत्राला हे अतीव दु:ख सहन करण्याची शक्ती मिळावी, अशी मी प्रार्थना करतो.''

### पंतप्रधानांनी व्यक्त केला शोक

**आपल्या शोकसंदेशात पंतप्रधान म्हणाले, प्रसिद्ध पंडवानी गायिका तीजन बाईजी यांच्या निधनामुळे मला अत्यंत दु:ख झालं आहे. आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाद्वारे त्यांनी छत्तीसगडम धील या लोककला प्रकाराला जगभरात एक वेगळी ओळख मि ळवून दिली. त्यांचं निधन ही कला आणि संस्कृतीच्या क्षेत्रासाठी कधीही भरून न येणारी हानी आहे. दु:खाच्या या कठीण प्रसंगी मी त्यांचे कुटुंबीय आणि चाहते यांच्याप्रती संवेदना व्यक्त करतो.**

# 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' : शेतकऱ्याच्या नव्या सुरुवातीची गुंतवणूक

नैसर्गिक संकटे, वाढता उत्पादन खर्च आणि कर्जबाजारीपणाच्या दुष्टचक्रात अडकलेल्या शेतकऱ्याला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना२०२६' जाहीर केली आहे. ही योजना केवळ थकीत कर्ज माफ करण्यापुरती मर्यादित नसून, शेतकऱ्याला पुन्हा उभारी देत ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा व्यापक प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील शेती अजूनही मोठ्या प्रमाणावर निसर्गावर अवलंबून आहे. अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, गारपीट, पूर, रोगराई आणि हवामानातील अनिश्चितता यामुळे शेतीचे गणित सातत्याने बिघडत आहे. त्यातच बियाणे, खते, कीटकनाशके, मजुरी आणि इंधनाच्या वाढत्या खर्चामुळे शेती करणे अधिक खर्चिक बनले आहे. अशा परिस्थितीत शेतकरी पीक कर्ज घेतो; मात्र नैसर्गिक किंवा बाजारातील प्रतिकूल परिस्थितीमुळे वेळेवर परतफेड करणे शक्य होत नाही. परिणामी तो नव्या कर्जासाठी अपात्र ठरतो आणि आर्थिक अडचणींचे चक्र अधिक गहिरे होत जाते.

याच पार्श्वभूमीवर शासनाने राबविलेली ही योजना शेतकऱ्याला नव्याने आर्थिक प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करते. कर्जमुक्तीमुळे




शेतकऱ्याला पुन्हा पीक कर्ज मिळण्याचा मार्ग मोकळा होईल, उत्पादनासाठी आवश्यक भांडवल उपलब्ध होईल आणि शेतीतील गुंतवणुकीला चालना मिळेल. त्यामुळे या योजनेकडे केवळ आर्थिक मदत म्हणून नव्हे, तर कृषी क्षेत्राच्या पुनर्बांधणीतील महत्त्वाचा टप्पा म्हणून पाहण्याची गरज आहे.

या योजनेचे एक वैशिष्ट्य म्हणजे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विचार करण्यात आला आहे. केवळ थकबाकीदारांना दिलासा देण्यापेक्षा आर्थिक शिस्त पाळणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ देण्याची भूमिका शासनाने स्वीकारली आहे. त्यामुळे कर्जमाफी आणि आर्थिक जबाबदारी यांच्यात संतुलन राखण्याचा प्रयत्न या योजनेत दिसून येतो.

एकवेळ समझोता ही तरतूदही अनेक शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे. पूर्वी निर्धारित मर्यादेपेक्षा थोडे अधिक कर्ज असल्याने अनेक पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहत होते. आता शेतकरी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासनाकडून निश्चित मर्यादेपर्यंतचा लाभ मिळू शकणार आहे. त्यामुळे हजारो शेतकऱ्यांना पुन्हा बँकिंग व्यवस्थेशी जोडले जाण्याची संधी उपलब्ध होईल.

कर्जमुक्तीचा परिणाम केवळ शेतकऱ्यापुरता मर्यादित राहत नाही. शेतकऱ्याच्या हातात आर्थिक तरलता निर्माण झाली की त्याचा लाभ खत-बियाणे विक्रेते, कृषी सेवा केंद्रे, कृषी अवजारे उत्पादक, वाहतूक व्यवसाय, दुग्धव्यवसाय, प्रक्रिया उद्योग तसेच ग्रामीण बाजारपेठेला होतो. त्यामुळे शेतकऱ्याला दिलेला आर्थिक आधार म्हणजे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मिळालेली नवी ऊर्जा होय.

या योजनेची अंमलबजावणी पूर्णपणे पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यावर शासनाने भर दिला आहे. बँकांकडून पात्र लाभार्थ्यांची माहिती थेट शासनाच्या पोर्टलवर अपलोड केली जात आहे. आधार प्रमाणीकरण, ॲग्रीस्टॅक प्रणाली, संगणकीय पडताळणी, गावनिहाय लाभार्थी यादी आणि तक्रार निवारण यंत्रणा यामुळे लाभ वितरण अधिक अचूक आणि विश्वासार्ह होणार आहे. त्यामुळे पात्र शेतकरी वंचित राहणार नाहीत आणि अपात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्याची शक्यता कमी होईल.

मात्र, शासनाचा दृष्टिकोन केवळ कर्जमाफीपुरता मर्यादित नाही. कर्जमाफी ही अंतिम उपाययोजना नसून शेतकऱ्याला स्वावलंबनाकडे नेणारी पहिली पायरी आहे. सिंचन सुविधा, कृषी पायाभूत सुविधा, पीक विविधीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, मूल्यवर्धन, प्रक्रिया उद्योग आणि शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देणे या दीर्घकालीन उपाययोजनांमुळे शेती अधिक सक्षम आणि शाश्वत करण्याचा प्रयत्न सुरू आहे.

या योजनेला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यामागेही एक अर्थपूर्ण संदेश आहे. लोककल्याण, जलव्यवस्थापन, शेती आणि ग्रामीण विकासाला प्राधान्य देणाऱ्या या दूरदर्शी राज्यकर्तीच्या त्रिशताब्दी जयंती वर्षात शेतकरी कल्याणाची योजना जाहीर करून शासनाने इतिहासातील लोकाभिमुख परंपरेला आधुनिक विकासदृष्टीची जोड दिली आहे.

आज शेतकऱ्याला सर्वाधिक गरज आहे ती आर्थिक दिलाशासोबत आत्मविश्वासाची. कर्जाचे ओझे हलके झाले की शेतकरी नव्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास, उत्पादन वाढविण्यास आणि शेतीकडे उद्योग म्हणून पाहण्यास अधिक सक्षम होतो. त्याचा सकारात्मक परिणाम उत्पादनक्षमता, ग्रामीण रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेवरही दिसून येतो.

'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना२०२६' ही केवळ कर्जमाफीची योजना नाही; ती शेतकऱ्याच्या नव्या सुरुवातीचा पाया आहे. शेतकऱ्याच्या श्रमांचा सन्मान, आर्थिक पुनर्बांधणी आणि कृषी क्षेत्राच्या दीर्घकालीन विकासाचा व्यापक संकल्प या योजनेतून व्यक्त होतो. सक्षम शेतकरी, सक्षम शेती आणि बळकट ग्रामीण अर्थव्यवस्था यांवरच विकसित महाराष्ट्राची भक्कम पायाभरणी उभी राहणार आहे. त्या दिशेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण आणि दूरदर्शी पाऊल आहे.

--------------

**जिल्हा माहिती कार्यालय, बुलढाणा**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### नेरुळमध्ये भलेमोठे झाड कोसळले; रिक्षा आणि दुचाकीचे नुकसान, मोठी दुर्घटना थोडक्यात टळली



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई । प्रतिनिधी :**नवी मुंबईतील नेरुळ सेक्टर दहा परिसरात सोसाट्याच्या वाऱ्यामुळे भलेमोठे झाड उन्मळून पडल्याची घटना घडली. हे झाड थेट रस्त्यालगत उभ्या असलेल्या रिक्षा आणि दुचाकींवर कोसळल्याने वाहनांचे मोठे नुकसान झाले. रिक्षामध्ये असलेल्या दोघांना स्थानिकांच्या मदतीने तात्काळ सुखरूप बाहेर काढण्यात आले, तर एका व्यक्तीला झाडाची फांदी लागून किरकोळ दुखापत झाली असून त्यांनाही सुरक्षित बाहेर काढण्यात आले. या घटनेत मोठी दुर्घटना थोडक्यात टळली. दरम्यान, नवी मुंबई महापालिकेने मान्सूनपूर्व झाडांची आवश्यक छाटणी केली नसल्यामुळेच अशा घटना घडत असल्याचा आरोप विरोधकांनी केला असून, मान्सूनपूर्व कामांबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

### वाशीतील जुन्या इमारतीचा भाग कोसळला; पादचाऱ्याचा जागीच मृत्यू, धोकादायक इमारतींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई । प्रतिनिधी :** नवी मुंबईतील वाशी सेक्टर अकरा येथील जुहूगाव परिसरात जुन्या इमारतीचा काही भाग कोसळून एका पादचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. शिवसेना शाखेजवळील अपना ढाबा परिसरात रस्त्यालगत असलेल्या चार मजली गीता आर्केड इमारतीचा काही भाग अचानक कोसळला. या दुर्घटनेत रस्त्यावरून पायी जात असलेल्या सुमारे पस्तीस वर्षीय व्यक्तीच्या डोक्यात लोखंडी सळई घुसल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलीस, अग्निशमन दल आणि आपत्कालीन यंत्रणा घटनास्थळी दाखल होऊन मदत व बचावकार्य सुरू केले. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून दुर्घटनेचे नेमके कारण शोधण्याचे काम सुरू आहे. या घटनेनंतर शहरातील धोकादायक आणि जीर्ण इमारतींचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### वाशीत उभी असलेल्या कारवर झाड कोसळले; कारचा चुराडा, सुदैवाने जीवितहानी टळली



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई । प्रतिनिधी :** नवी मुंबईतील वाशी सेक्टर-१५ परिसरात जोरदार वारे आणि खराब हवामानामुळे रस्त्याच्या कडेला उभी असलेल्या कारवर अचानक मोठे झाड कोसळल्याची घटना घडली. या दुर्घटनेत कारचे मोठे नुकसान झाले असून वाहनाचा अक्षरशः चुराडा झाला आहे. सुदैवाने घटना घडली त्यावेळी कारमध्ये कोणीही नसल्याने जीवितहानी टळली. घटनेची माहिती मिळताच संबंधित विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले आणि झाड हटविण्याची कारवाई सुरू केली. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यांमुळे नवी मुंबईत झाडे कोसळण्याच्या घटना वाढत असून, प्रशासनाने नागरिकांना मोठ्या झाडांच्या खाली वाहने उभी न करण्याचे आणि सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.

# आषाढी वारीत प्रथमच एअर ॲम्बुलन्स : आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर

## वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी आरोग्य विभागाचे नियोजन

दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर । प्रतिनिधी :** यंदाची आषाढी वारी वारकऱ्यांसाठी अधिक सुरक्षित आणि आरोग्यदायी करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाने प्रथमच अत्यावश्यक रुग्णांसाठी एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करून देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासोबतच सुसज्ज रुग्णवाहिका, बाईक ॲम्बुलन्स, आपत्कालीन वैद्यकीय पथके आणि डिजिटल आरोग्य व्यवस्थेच्या माध्यमातून लाखो वारकरी भाविकांना तातडीची उपचार सेवा देण्यासाठी सर्वंकष नियोजन करण्यात आले आहे. आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील केबीपी महाविद्यालयात पालखी मार्ग आणि मुक्कामस्थळी उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांचा सविस्तर आढावा घेत आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आवश्यक त्या सूचना दिल्या.

आरोग्य मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, यंदाच्या वारीचे विशेष आकर्षण म्हणजे अत्यावश्यक रुग्णांना कमी वेळेत उच्चस्तरीय उपचार मिळावेत यासाठी प्रथमच एअर ॲम्बुलन्सची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. गंभीर रुग्णांना तातडीने विशेष रुग्णालयात हलविण्यासाठी ही सेवा महत्त्वाची ठरणार आहे. याशिवाय, गर्दीच्या ठिकाणी जलद पोहोचण्यासाठी बाईक ॲम्बुलन्स, आधुनिक जीवनरक्षक उपकरणांनी सज्ज रुग्णवाहिका आणि प्रशिक्षित वैद्यकीय पथके सतत कार्यरत राहणार आहेत.

'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' आणि 'आरोग्यसंपन्न वारी' या डिजिटल उपक्रमांच्या माध्यमातून वारकरी भाविकांना पालखी मार्गावरच आरोग्यविषयक माहिती, मार्गदर्शन आणि तातडीच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. प्रत्येक आरोग्य कर्मचारी आणि आशा सेविकेमार्फत आवश्यक आरोग्य



संदेश, आजार प्रतिबंधक उपाययोजना आणि उपचार सेवा भाविकांपर्यंत पोहोचविण्यात येणार आहेत.

वारकरी घरातून वारीसाठी प्रस्थान केल्यापासून ते सुखरूप घरी परतेपर्यंत त्यांच्या आरोग्याची सातत्याने काळजी घेण्याचे व्यापक नियोजन आरोग्य विभागाने केले आहे. पालखी मार्गावरील प्रत्येक टप्प्यावर आरोग्य सेवा उपलब्ध राहतील, यासाठी संबंधित जिल्हा प्रशासन आणि आरोग्य यंत्रणांमध्ये प्रभावी समन्वय ठेवण्याच्या सूचनाही यावेळी आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी दिल्या.

यंदाची आषाढी वारी केवळ भक्तीचा नव्हे, तर अत्याधुनिक आरोग्य व्यवस्थापनाचा आदर्श ठरणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

बैठकीच्या प्रारंभी आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर यांनी वारीसाठी आरोग्य विभागाने केलेल्या व्यापक नियोजनाची माहिती सादर केली. पालखी मार्गावरील आरोग्य केंद्रे, तात्पुरती वैद्यकीय पथके, औषधसाठा, रुग्णवाहिका सेवा, आपत्कालीन प्रतिसाद व्यवस्था तसेच मनुष्यबळाची उपलब्धता याबाबतची माहिती दिली.

या बैठकीस आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक संजय काटकर तसेच पुणे, सातारा आणि सोलापूर जिल्ह्यांतील प्रशासन व आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी प्रत्यक्ष आणि दृकश्राव्य माध्यमातून उपस्थित होते.

## सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुसळधार पाऊस; भुईबावडा घाटात दरड कोसळली

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी :** सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस कोसळत असून, शनिवारी वैभववाडी तालुक्यातील भुईबावडा घाटात रात्री साडेनऊच्या सुमारास अचानक मोठी दरड कोसळल्याची घटना घडली. यामुळे मार्गावरील वाहतूक दोन्ही बाजूंनी ठप्प झाली होती. मात्र, प्रशासनाकडून तात्काळ कार्यवाही करत रस्ता वाहतुकीसाठी खुला करून देण्यात आला आहे. यामुळे घाटमार्गातून एकेरी वाहतूक सुरू झाली आहे.

पावसामुळे रस्ता साफ करण्याच्या कामात काही प्रमाणात अडथळे : या घटनेची माहिती मिळताच जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे यांनी प्रशासनाशी चर्चा करून संबंधित अधिकाऱ्यांकडून परिस्थितीचा आढावा घेत आवश्यक सूचना दिल्या. दरड कोसळल्याची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन तातडीने घटनास्थळी दाखल झाले. रात्रीची वेळ आणि सुरू असलेल्या पावसामुळे रस्ता साफ करण्याच्या कामात काही प्रमाणात अडथळे येत होते. मात्र, जेसीबीच्या साहाय्याने दरड हटवून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यात आला असून, घाटमार्गातून एकेरी वाहतुकीस प्रारंभ झाला आहे. अचानक वाहतूक बंद झाल्याने काही काळ वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. मात्र, प्रशासनाच्या तातडीच्या प्रयत्नांमुळे अडकून पडलेल्या प्रवाशांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे. प्रशासनाने नागरिकांना घाटमार्गातून प्रवास करताना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

प्रवाशांनी पर्याय रस्ता असलेल्या करूळ घाट मार्गाचा वापर करावा : जिल्ह्यातील महत्त्वाच्या घाटापैकी भुईबावडा घाटमार्ग महत्त्वाचा असून या मार्गावरून कोल्हापूर पुणेकडे वाहतूक सुरू असते. प्रवाशांनी पर्याय रस्ता असलेल्या करूळ घाट मार्गाचा वापर करावा, असे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. गगनबावडा परिसरात मुसळधार पाऊस कोसळत असल्यानं करूळ घाट आणि भुईबावडा घाटात दरड कोसळण्याच्या घटना वारंवार घडत असतात. भुईबावडा घाटातील दरड हटवण्याचं काम युद्ध पातळीवर सुरू असून, लवकरच भुईबावडा घाटमार्ग रस्ते वाहतुकीसाठी पूर्ववत करण्यात येणार आहे.

## दौंड बंधाऱ्यातून उजनीकडे पाण्याची आवक सुरु; धरणाच्या पाणीपातळीत वाढ होण्याची चिन्हे

**बारामती । प्रतिनिधी** : पुणे जिल्ह्याच्या पश्चिम घाटमाथ्यावर झालेल्या दमदार पावसाचा परिणाम भीमा नदी खोऱ्यात दिसू लागला आहे. दौंड बंधाऱ्यातून उजनी धरणाकडे पाण्याची आवक सुरू झाली असून, सध्या भीमा नदीपात्रात ६, ८८३ क्युसेक वेगानं पाण्याचा विसर्ग होत आहे.

या आवकेमुळे उजनी धरणाच्या पाणीपातळीत हळूहळू वाढ होण्याची शक्यता आहे. पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांसाठी महत्त्वाचे जलस्रोत असलेल्या उजनी धरणातील सध्याचा पाणीसाठा उणे २७.९६ टक्के इतका आहे. विशेष म्हणजे, गेल्या काही दिवसांपासून धरणातील पाणीसाठा चिंताजनक पातळीवर होता. मात्र, पश्चिम घाटातील पावसामुळे भीमा नदीमार्गे पाण्याची आवक सुरू झाल्याने दिलासादायक परिस्थिती निर्माण झाली आहे.

उजनी धरणातील पाणीसाठ्यात वाढ होणार : दौंड बंधाऱ्यातून सुरू झालेली पाण्याची आवक पुढील काही दिवस कायम राहिल्यास उजनी धरणातील पाणीसाठ्यात टप्प्याटप्प्यानं वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. तसेच, पश्चिम घाट परिसरात आणखी सम ाधानकारक पाऊस झाल्यास धरणात येणाऱ्या पाण्याच्या आवकेतही वाढ होण्याची शक्यता आहे.

## भिवंडीत जलमय रस्त्यांवर स्पायडरमॅनची एन्ट्री; नागरिकांना मदतीसह मनोरंजन, व्हिडिओ व्हायरल

दैनिक आपला विदर्भ

**भिवंडी । प्रतिनिधी :** भिवंडीत मुसळधार पावसामुळे सखल भाग जलमय झाल्याने नागरिकांचे मोठे हाल झाले. मात्र या परिस्थितीत स्पायडरमॅनच्या वेशात आलेल्या एका तरुणाने नागरिकांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला. रस्त्यावरील कचरा साफ करत पाण्याचा निचरा करून दिला, नागरिकांना सुरक्षितपणे रस्ता ओलांडण्यास मदत केली आणि लहान मुलांचे मनोरंजनही केले. या अनोख्या स्पायडरमॅनचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.





शनिवारी झालेल्या मुसळधार पावसानंतर भिवंडीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक, तीनबत्ती, भाजी मार्केटसह अनेक सखल भागांमध्ये गुडघाभर पाणी साचले होते. ड्रेनेज लाईनमध्ये कचरा अडकल्याने पाण्याचा निचरा होत नव्हता. याचवेळी स्पायडरमॅनचा पोशाख घातलेल्या एका तरुणाने पाण्यात उतरून हाताने कचरा काढत नाले मोकळे केले. तसेच पाण्यातून जाणाऱ्या नागरिकांना आणि वाहनचालकांना सुरक्षितपणे मार्ग काढण्यासाठी मदत केली. एवढेच नव्हे तर लहान मुलांना खांद्यावर घेऊन त्यांचे मनोरंजनही केले. या अनोख्या समाजसेवेचे नागरिकांनी कौतुक केले असून त्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

## धुवांधार पाऊस अन् विकेंडचा योग; आंबोली धबधब्यावर पर्यटकांची अलोट गर्दी



दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग । प्रतिनिधी :** सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली घाटात धुवांधार पाऊस आणि रविवारच्या सुट्टीचा योग जुळून आल्याने पर्यटकांची अलोट गर्दी झाली आहे. राज्याच्या विविध भागांसह गोवा आणि कर्नाटकातून हजारो पर्यटकांनी आंबोली धबधब्यावर हजेरी लावत निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद लुटला. गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे मुख्य धबधबा दुथडी भरून वाहत असून दाट धुके, आल्हाददायक गारवा आणि हिरवाईने नटलेला परिसर पर्यटकांना अक्षरशः मोहिनी घालत आहे. धबधब्याच्या कोसळणाऱ्या पाण्यात भिजण्याचा आनंद घेण्यासाठी तरुणाईसह कुटुंबीयांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. मात्र, वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासनाने पर्यटकांना सुरक्षिततेचे नियम पाळण्याचे आणि धोकादायक ठिकाणी जाणे टाळण्याचे आवाहन केले आहे.

# कुंडलिका नदीने ओलांडली धोक्याची पातळी

## रोहा शहरात पुराचे पाणी, शंभरहून अधिक नागरिकांची सुखरूप सुटका

दैनिक आपला विदर्भ

**रायगड । प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील रोहा येथे गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कुंडलिका नदीने धोक्याची पातळी ओलांडली असून नदीचे पाणी शहरात शिरल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. सखल भागांसह बाजारपेठ, घरे आणि दुकानांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले असून सुरक्षित ठिकाणी जाण्यासाठी धावपळ सुरू आहे. या गंभीर परिस्थितीत कोलाड बचाव पथक आणि एनव्हीआरएस बचाव पथक यांनी युद्धपातळीवर बचावकार्य हाती घेतले. पाण्याच्या वेगवान प्रवाहात रेल्वे मार्गावर अडकलेल्या नागरिकांसह एकूण शंभर ते एकशे पंचवीस जणांना सुखरूप बाहेर काढून सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. या बचाव मोहिमेत महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांचाही समावेश होता. प्रशासनाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले असून नागरिकांनी सतर्क राहून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## वृत्तविशेष...

### पाकिस्तानात कर्णधारपदाची संगीतखुर्ची सुरूच; बाबर आझमकडे पुन्हा धुरा

**दैनिक आपला विदर्भ**

नवी दिल्ली : पाकिस्तान क्रिकेट संघात मोठा बदल पाहायला मिळाला आहे. पाकिस्तान संघाने वेस्ट इंडिज आणि इंग्लंडविरूद्ध कसोटी मालिकेसाठी संघ जाहीर केला आहे. या कसोटी संघाचा कर्णधार बदलला असून आता पाकिस्तानने कसोटी संघाची जबाबदारी पुन्हा एकदा अनुभवी बाबर आझमच्या खांद्यावर दिली आहे. पाकिस्तानचा कसोटी संघ गेल्या काही वर्षांपासून सातत्यपूर्ण कामगिरी करण्यात अपयशी ठरत आहे. घरच्या मैदानावरही संघाला अनेक धक्कादायक पराभवांचा सामना करावा लागला असून फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्ही विभागांतील अस्थिरता स्पष्टपणे दिसून आली आहे.

नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय मालिकांमध्येही पाकिस्तानला अपेक्षित यश मिळालं नाही. कसोटी, एकदिवसीय आणि टी-२० या तिन्ही प्रकारांत संघाची कामगिरी चढ-उताराची राहिली असून नेतृत्व, संघनिवड आणि सातत्यपूर्ण प्रदर्शन यावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात होते, यादरम्यान आता पाकिस्तान संघ व्यवस्थापनाने नेतृत्त्वात मोठा बदल करत बाबर आझमकडे नेतृत्त्व सोपावलं आहे.

### पुणेकरांसाठी आनंदवार्ता! म्हाडा पुणे मंडळाच्या अंदाजे ४ हजार घरांची सोडत जुलै अखेरीस जाहिरात

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई । प्रतिनिधी :** म्हाडाच्या पुणे मंडळाकडून फेब्रुवारीमध्ये ४,१८६ घरांची सोडत काढण्यात आली होती. तर काही दिवसांपूर्वीच ताथवडेतील ७९२ घरांसाठीची सोडत पार पडली आहे. अशात आता पुणे मंडळाने पुण्यातील आणखी अंदाजे ४ हजार घरांची सोडत काढण्याची तयारी सुरू केली आहे. ही तयारी पूर्ण करून जुलैअखेरीस या घरांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली जाणार आहे. जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर नोंदणी, अर्जविक्री-स्वीकृती प्रक्रियेस सुरुवात केली जाणार आहे. म्हाडाच्या पुणे मंडळाच्या या घोषणेमुळे पुण्यात खासगी विकासकाच्या प्रकल्पात परवडणाऱ्या दरात हक्काचे घर घेण्याची संधी इच्छुकांना मिळणार आहे. कारण ४ हजार घरांपैकी अंदाजे ३ हजार घरे २० टक्के योजनेतील आहेत.मुंबई महानगर प्रदेश, नाशिक येथे २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील घरे म्हणावी तशी उपलब्ध होत नसली, तरी पुणे मंडळाला मात्र मोठ्या संख्येने २० टक्के योजनेतील घरे उपलब्ध होत आहेत. पुणे मंडळाकडून सातत्याने संबंधित पालिकांकडे पाठपुरावा केला जात असल्याने गेल्या वर्षी मंडळाला २० टक्के आणि १५ टक्के एकात्मिक योजनेतील एकूण ४,१८३ घरे उपलब्ध झाली होती. या घरांसाठी सप्टेंबर २०२५ मध्ये सोडतपूर्व प्रक्रिया सुरू केली, तर फेब्रुवारी २०२६ मध्ये सोडत काढण्यात आली आहे. आता मंडळाला २० टक्के योजनेतील आणखी अंदाजे ३ हजार घरे उपलब्ध झाली आहेत. तेव्हा या ३ हजार घरांसह रिक्त अंदाजे १ हजार घरे मिळून एकूण अंदाजे ४ हजार घरांसाठी सोडत काढण्याची तयारी मंडळाने सुरू केली आहे. जुलैअखेरीस ४ हजार घरांच्या सोडतीसाठीची जाहिरात प्रसिद्ध केली जाणार असल्याची माहिती पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी राहुल साकोरे यांनी दिली. २० लाख ते ३० लाखांपर्यंतची घरे पिंपरी-चिंचवड पालिका, पुणे पालिका आणि पीएमआरडीएकडून मंडळाला अंदाजे ३ हजार घरे २० टक्के योजनेअंतर्गत उपलब्ध झाली आहेत. ही घरे अत्यल्प आणि अल्प गटासाठी असणार असून, ही घरे ३० ते ५० चौ. मीटरची असणार आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या घरांच्या किंमती २० लाख ते ३० लाख रुपये अशा असण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुण्यात परवडणाऱ्या दरात म्हाडाच्या माध्यमातून खासगी विकासकांच्या प्रकल्पात घर घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे इच्छुकांनी आता तयारीला लागावे, असे आवाहनही मंडळाने केले आहे.

### १५ वर्षांनंतर सेलिना मोठ्या पडद्यावर परतणार, 'सिस्टर निवेदिता'ची भूमिका साकारणार

**मुंबई । प्रतिनिधी :** सेलिना जेटली सुमारे १५ वर्षांनंतर मोठ्या पडद्यावर पुनरागमन करणार आहे. ती दिग्दर्शक राम कमल मुखर्जी यांच्या पुढील बायोपिकमध्ये सिस्टर निवेदिता (मार्गारिट नोबल) यांची भूमिका साकारणार आहे. आपल्या एका मुलाखतीत सेलिनाने सांगितले की, हा चित्रपट तिच्या कारकिर्दीतील सर्वात खास अनुभवांपैकी एक आहे. तिने सांगितले की, राम कमल मुखर्जी यांच्यासोबत काम करणे तिच्यासाठी एक वेगळा अनुभव होता आणि ही भूमिका साकारणे तिच्यासाठी केवळ अभिनय नसून एक जबाबदारी आहे. सेलिना म्हणते... 'सिस्टर निवेदिता मला सर्वात जास्त प्रभावित करतात, कारण त्यांचा जन्म भारतात झाला नव्हता, तरीही त्यांनी आपले जीवन भारत, त्याची संस्कृती, आध्यात्मिक विचार आणि लोकांच्या सेवेसाठी समर्पित केले.' सिस्टर निवेदिता या स्वामी विवेकानंदांच्या आयरिश शिष्या होत्या, ज्यांनी आपले जीवन भारताच्या शिक्षण, समाजसेवा आणि राष्ट्रजागरणासाठी समर्पित केले. महिला शिक्षण आणि भारतीय संस्कृतीच्या प्रचार-प्रसारातील त्यांचे योगदान आजही प्रेरणास्रोत मानले जाते.

# डोणगाव ग्रामपंचायतीचा ढिसाळ कारभार?

## राज्य महामार्गालगत कचऱ्याचे साम्राज्य; नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

## छत्रपती संभाजीनगर-नागपूर राज्य महामार्गावरील डोणगावमध्ये दुर्गंधीचा विळखा; स्वच्छता व्यवस्थेवर नागरिकांचा सवाल





**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगाव। प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर-नागपूर राज्य महामार्गावरील डोणगाव येथे ग्रामपंचायतीच्या स्वच्छता व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. गावातील एका आरा मशीनसमोर महामार्गालगत मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे ढीग साचल्याने परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली असून, नागरिकांसह प्रवासी आणि वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या प्रकारामुळे ग्रामपंचायतीच्या स्वच्छता व्यवस्थेवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दररोज या राज्य महामार्गावरून हजारो लहान-मोठी वाहने धावतात. त्यामुळे या मार्गावरील स्वच्छता आणि परिसराची देखभाल महत्त्वाची मानली जाते. मात्र, महामार्गालगत साचलेल्या कचऱ्यामुळे परिसराचे विद्रूप चित्र निर्माण झाले असून, दुर्गंधीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या ठिकाणी अनेक दिवसांपासून घरगुती कचरा, प्लास्टिक आणि इतर टाकाऊ वस्तूंचे ढीग साचत आहेत. याबाबत ग्रामपंचायतीचे वारंवार लक्ष वेधूनही अद्याप प्रभावी उपाययोजना करण्यात आलेली नसल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस सुरू असल्याने साचलेल्या कचऱ्यात पाणी तुंबून डास, माशा आणि रोगराई पसरवणाऱ्या कीटकांची पैदास होण्याचा धोका वाढला आहे. त्यामुळे डेंग्यू, मलेरिया, गॅस्ट्रो आणि इतर संसर्गजन्य आजारांचा फैलाव होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे.

एकीकडे शासनाकडून स्वच्छ भारत अभियान अंतर्गत स्वच्छतेबाबत व्यापक जनजागृती केली जात असताना, दुसरीकडे डोणगावमधील हे वास्तव त्या अभियानालाच हरताळ फासणारे असल्याची प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. सार्वजनिक ठिकाणी कचऱ्याचे ढीग साचणे ही केवळ अस्वच्छतेची बाब नसून, ती थेट सार्वजनिक आरोग्याशी संबंधित गंभीर समस्या असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

नागरिकांनी संबंधित ग्रामपंचायत प्रशासन, पंचायत समिती आणि जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन साचलेला कचरा हटवावा, नियमित स्वच्छता व्यवस्था सुरू करावी आणि भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे.

## अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना : अर्ज करण्यापूर्वी आवश्यक बाबींची खातरजमा करा; लाभ मिळण्यास होईल मदत

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा । प्रतिनिधी :** राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांना वेळेत व सुरळीत मिळावा, यासाठी अर्जासोबत सादर करण्यात येणारी माहिती व कागदपत्रे अचूक असणे आवश्यक आहे. अर्ज प्रक्रियेदरम्यान आवश्यक बाबींची पूर्वतयारी केल्यास पडताळणी प्रक्रिया अधिक सुलभ होण्यास मदत होते.

शेतकऱ्यांनी आधार कार्ड, बँक खाते, कर्ज खात्याची माहिती तसेच इतर आवश्यक कागदपत्रांवरील नाव व तपशील एकसारखे असल्याची खात्री करून घ्यावी. नाव, जन्मतारीख अथवा इतर तपशीलांमध्ये विसंगती असल्यास संबंधित कार्यालयामार्फत ती दुरुस्त करून घ्यावी. योजनेचा लाभ प्राप्त करण्यासाठी बँक खाते कार्यरत असणे, आधार क्रमांकाशी संलग्न असणे तसेच केवायसी प्रक्रिया पूर्ण असणे महत्त्वाचे आहे. याशिवाय मोबाईल क्रमांक अद्ययावत असल्यास शासन किंवा संबंधित यंत्रणेकडून मिळणाऱ्या सूचना वेळेवर प्राप्त होण्यास मदत होते.

शेतकऱ्यांनी कर्ज खात्याशी संबंधित माहिती, आवश्यक कागदपत्रे आणि बँकेतील नोंदी यांची वेळोवेळी पडताळणी करून ठेवावी. अर्ज भरताना सर्व माहिती काळजीपूर्वक नोंदवावी. कोणतीही शंका असल्यास संबंधित बँक, कृषी विभाग अथवा सहकार विभागाशी संपर्क साधावा.

शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवून आवश्यक प्रक्रिया पूर्ण करावी. योग्य माहिती आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यास योजनेचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत अधिक वेगाने पोहोचण्यास मदत होणार आहे.

## नातवाच्या मृत्यूचा धक्का सहन न झाल्यानं केतन अग्रवालच्या आजोबांचं निधन

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे । प्रतिनिधी :** लोहगडावर झालेल्या केतन अग्रवाल हत्या प्रकरणामुळं आधीच दुःखाच्या छायेत असलेल्या अग्रवाल कुटुंबावर पुन्हा एकदा शोककळा पसरली आहे. दिवंगत केतन अग्रवालचे आजोबा देविचंद अग्रवाल यांचं पुण्यात निधन झालं आहे. नातवाच्या मृत्यूचा मोठा मानसिक धक्का बसल्यानंतर त्यांची प्रकृती खालावली होती. त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच त्यांची प्राणज्योत मालवली. केतन अग्रवाल हत्याप्रकरणानंतर देविचंद अग्रवाल यांनी कुटुंबाला धीर देत न्यायासाठी लढण्याची भूमिका घेतली होती. अवघ्या आठवडाभरापूर्वीच त्यांनी केतनला न्याय मिळावा या मागणीसाठी आयोजित करण्यात आलेल्या कँडल मार्चमध्ये स्वत: सहभागी होत नेतृत्व केलं होतं. वयोमान असूनही नातवासाठी न्याय मिळवण्याची त्यांची तळमळ नागरिकांनाही भावूक करून गेली होती.

आरोपींना कठोर शिक्षा मिळण्याची केली होती मागणी : कँडल मार्चदरम्यान त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना अनेक गंभीर आरोप केले होते. सिया गोयलच्या कुटुंबीयांनी लग्नासाठी दबाव टाकल्याचा आरोप त्यांनी केला होता. तसंच या संपूर्ण प्रकरणातील प्रत्येक संबंधित व्यक्तीची सखोल चौकशी करण्यात यावी आणि दोषी आढळणाऱ्या सर्वांवर कठोर कारवाई व्हावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली होती. केतनच्या मृत्यूमागील सत्य पूर्णपणे समोर यावे आणि आरोपींना कायद्यानुसार कठोर शिक्षा मिळावी, अशी त्यांची सातत्याने भूमिका होती.

केतनच्या मृत्यूनंतर संपूर्ण कुटुंबाला मोठा मानसिक धक्का बसला होता. अशा परिस्थितीत देविचंद अग्रवाल हे कुटुंबासाठी आधारस्तंभ होते. मात्र, नातवाच्या निधनाचं दु:ख आणि त्यानंतर सुरू झालेल्या न्यायलढ्याचा ताण यामुळं त्यांच्या प्रकृतीवर परिणाम झाल्याचं सांगितलं जात आहे. देविचंद अग्रवाल यांच्या निधनामुळं अग्रवाल कुटुंबावर पुन्हा एकदा दु:खाचा डोंगर कोसळला आहे. एका बाजूला केतनच्या हत्येचा तपास सुरू असताना, दुसऱ्या बाजूला कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तीच्या निधनानं वातावरण अधिकच शोकाकुल झालं आहे.

आरोपींना कठोर शिक्षा होण्यासाठी मागणी : केतन अग्रवाल हत्याप्रकरणाचा तपास सुरू असून, या प्रकरणातील सत्य समोर आणण्यासाठी आणि दोषींना कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी कुटुंबीयांसह नागरिकांकडून सातत्यानं केली जात आहे. देविचंद अग्रवाल यांनी व्यक्त केलेली हीच इच्छा आता त्यांच्या निधनानंतरही कुटुंबीय आणि न्यायाची मागणी करणाऱ्यांसाठी एक मोठी जबाबदारी बनली आहे.

## एकाच कुटुंबातील पाच सदस्य अचानक बेपत्ता; १० दिवसानंतरही शोध लागेना

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर । प्रतिनिधी :** नागपूर शहराच्या धंतोली पोलीस ठाणे हद्दीतून एकाच कुटुंबातील पाच सदस्य बेपत्ता झाल्यानं शहरात खळबळ उडाली आहे. सुरेश परसवानी यांच्या कुटुंबतील हे ५ सदस्य गेल्या महिन्याच्या २४ जूनपासून बेपत्ता आहेत. या संदर्भात २९ जून रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून पोलीस या पाच लोकांचा कसोशीने शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत. तरी अद्याप काही ठोस माहिती धंतोली पोलिसांच्या हाती आलेली नाही, त्यामुळंच परसवानी कुटुंबातील ५ सदस्य कुठे गेलेत याबाबत कुणाकडं माहिती नाही. परसवानी कुटुंबातील पाच बेपत्ता झालेल्या या सदस्यांमध्ये ५७ वर्षीय हर्षा सुरेश परसवानी या सर्वात जेष्ठ महिलेचा समावेश आहे. तर त्याचा मुलगा ४२ वर्षीय जितेंद्र परसवानी, ४० वर्षीय सून ईशीता जितेंद्र परसवानी, २१ वर्षीय खुशी जितेंद्र परसवानी आणि १२ वर्षीय कृष्णा जितेंद्र परसवानी यांचा समावेश आहे.

परसवानी धंतोली पोलीस स्टेशनचे हद्दीत एकत्र राहतात. ते सर्वच राहत्या घरातून कोणाला काही न सांगता निघून गेले आहेत, घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाहीत. त्यामुळं शामसुंदर किंमतराय परसवानी यांनी २९ जूनला याबाबत धंतोली पोलीस ठाण्यात कुटुंबातील पाच सदस्य बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे.

परसवानी कुटुंबातील पाच सदस्य एकाचवेळी घरातून निघून गेल्यानं अनेक तर्कवितर्क देखील लावले जात आहेत. ५ सदस्यांनी एकाचवेळी घर का सोडलं असावं, त्यामागे कुटुंबातील वाद, संपत्ती वाद किंवा इतर कुठला अँगल आहे का? याबाबत देखील पोलिसांनी तपास सुरू केला आहे. याशिवाय घातपाताची शक्यता तर नाही ना हे देखील पडताळून पाहिले जात आहे.

# सोमनाथ मंदिर आस्थेच्या केंद्रासोबतच राष्ट्रीय स्वाभिमानाचे प्रतीक मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार

**दैनिक आपला विदर्भ**



**मुंबई । प्रतिनिधी :** सांस्कृतिक कार्य विभाग तथा सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने आयोजित 'सोमनाथ स्वाभिमान पर्व अखंड श्रद्धेची १००० वर्षे' या विशेष सांस्कृतिक उपक्रमास मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक येथून रेल्वेमार्गे प्रारंभ झाला.

यावेळी सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विकास मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी सहभागी नागरिकांशी संवाद साधताना ते म्हणाले, 'सोमनाथ मंदिर केवळ आस्थेच्या केंद्रासोबतच राष्ट्रीय स्वाभिमान, सांस्कृतिक अस्मिता आणि भारतीय सभ्यतेच्या अखंड परंपरेचे प्रतीक आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून सोमनाथ मंदिराचा इतिहास, सांस्कृतिक वारसा आणि त्यामागील प्रेरणादायी परंपरा अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.'

**सोमनाथ स्वाभिमान पर्व - अखंड श्रद्धेची १००० वर्षे उपक्रमास प्रारंभ**

या यात्रेत सहभागी नागरिकांना सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दर्शन, मंदिराचा ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा तसेच भारतीय परंपरेतील त्याचे महत्त्व यांची माहिती देण्यात येणार आहे. यात्रेदरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रम, संवाद सत्रे आणि भारतीय सांस्कृतिक मूल्यांवर आधारित उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमास विधानसभा सदस्य संजय उपाध्ये, नगरसेवक शिवा शेट्टी, आयआरसीटीसीचे अतिरिक्त कार्यकारी प्रबंधक हर्षवर्धनसिंग रावत तसेच रेल्वेचे अतिरिक्त वाणिज्य व्यवस्थापक अमित करवंदे यांची उपस्थिती होती.

यावेळी सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांनी सांगितले की, राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन करण्यासाठी तसेच अभिजात कला, लोककला आणि भारतीय परंपरेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभागामार्फत विविध उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहेत. 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' या उपक्रमामुळे सोमनाथच्या वैभवशाली इतिहासाचा, आध्यात्मिक परंपरेचा आणि सांस्कृतिक वारशाचा परिचय अधिक व्यापकपणे होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.